PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 9, ISSUE 1

# महिला बचत गटाचे आर्थिक अध्ययन

**डॉ. राजेश्वर डी. रहांगडाले**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व सहाय्यक प्राध्यापक
राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर, जि. चंद्रपूर
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना:-

भारतीय स्वतंत्रनंतरच्या काळात महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी देशभरात अनेक योजना राबविल्या जात आहेत. पूर्वी पासूनच चालत आलेल्या चालीरीती, रूढी, परंपरामुळे महिलांना आर्थिक, सामाजिक आणि आरोग्य बाबतच्या अनेक संकटांना सामोरे जावे लागत असते. परंतु, गेल्या काही वर्षांपासून महिला सबलीकरण, सक्षमीकरणावर भर देऊन स्त्री व पुरुष यांच्यात सर्व बाबतीत समानता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने महिला स्वयंसहायता समूह चळवळ देशपातळीवर जोमाने सुरू आहे. महिला आर्थिकदृष्ट्या एकत्रित येऊन स्वावलंबी होतील तेव्हाच त्या सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने आत्मविश्वासाने वावरू शकतील, व्यवसाय उद्योगधंदे करतील. चूल आणि मूल ही संज्ञा समूळ नष्ट करून खऱ्या अर्थाने त्यांचे सबलीकरण होईल. स्वतःचे कुटूंब, समाजाला पुढे नेऊन पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्वतःची सक्षमता सिद्ध करू शकतील. महिलांच्या सबलीकरणाची व आर्थिक सक्षमीकरणाची चळवळ बचत गटामुळे यशस्वी होत आहे.

स्वतःच्या समस्या स्वतःच्याच पध्दतीने स्वतःच सोडविता येण्याची क्षमता स्त्रियांना लाभली पाहिजे. त्यांच्याकरिता म्हणून दुसरा कोणी ते कार्य करू शकत नाही आणि कोणी ते करूही नये. जगातल्या कोणत्याही स्त्रिया इतक्याच योग्यतेने भारतीय स्त्रियाही ते काय करू शकतील, असे उद्गार स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल स्वामी विवेकानंद यांनी काढले होते. आज महिला बचत गट या संकल्पनेवर काम करताना 20 वर्षात ते

पदोपदी जाणवते. स्त्रियांबद्दल विश्वास व त्यांची कसोटी इतिहासकालीन घटनावरून अधोरेखित होते. 21 व्या युगातील भारत महासत्ता विकासाकडे घेणारे झेप यात स्त्रीशक्तीचा 50 टक्के वाटा अस्तित्वाने जरी असला तरी खरी कार्यशक्तीतूनच त्याची प्रचिती येऊ शकते. महिला बचत गट आज लाखोच्या घरात कार्यरत आहे. महिलांनी महिलांच्या विकासासाठी परस्पर समन्वयातून बचतीच्या माध्यमातून साधलेले एकत्रीकरण म्हणजे महिला बचतगट होतात यात स्वावलंबन, एकसारखी बचत समूहशक्ती या त्रिसुत्रीचा वापर केला जातो. महिलांचे सक्षमीकरण महिला बचतगटाने कसे साध्य केले याच्या खरं तर यशोगाथा अनेक वेळा आपण पहातो, ऐकतो पण माझ्या मते स्त्रीचे सक्षमीकरण टप्प्याटप्प्याच्या प्रक्रियेवर आधारीत आहे. 1)मानसिक सक्षमीकरण 2)आर्थिक सक्षमीकरण 3)सामाजिक सक्षमीकरण 4)राजकीय सक्षमीकरण एका वेळेची खाण्याची भ्रांत असलेल्या सावकारशाहीच्या कर्जात बुडालेल्या महिलांनी बचत गटात सहभागी होऊन आता आपल्या गरिबीवर मात केली आहे.

**महिला बचत गटाचा इतिहास:-** महिला बचत गटाची संकल्पना सर्वप्रथम बांगलादेशात रुजली गेली. डॉ. महमंद युनूस यांनी 1983 साली बांगलादेशातील चितगाव येथे महिला बचत गटाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर, 1991 मध्ये भारतात बचत गट सुरू होऊ लागले. पहिल्या वर्षात 500 बचत गट स्थापनेचे उद्दिष्टे ठेवले होते. परंतु हा आकडा 250 वर स्थिरावला गेला. पुढे,1998 पासून मात्र या चळवळेने वेग घेतला. सावकारी कर्ज आणि त्याच्या अवाढव्य व्यजातून मुक्त होण्यासाठी बचत गट हा महिलांसाठी एकमेव पर्याय होता. सद्यस्थितीत अनेक बँका आणि स्वयंसेवी संस्था बचत गटाला बळकटसाठी कार्यरत झाल्या आहेत. आजच्या स्थितीत आंध्रप्रदेशात सर्वाधिक बचत गट कार्यरत आहेत. त्याखालोखाल तामिळनाडू, महाराष्ट्र राज्यात बचत गट मोठया प्रमाणात कार्यरत आहेत.

ग्रामीण भागातील दुर्लब गरीब महिलांना, जनतेला त्यांच्या वैयक्तिक मूलभूत गरजा भागविण्यासाठी तसेच व्यवसाय उद्योगधंदे उभे राहावे आणि त्यांची सावकाराच्या पाशातून मुक्तता होऊन अल्प दरात कर्ज उपलब्ध व्हावे हे उद्दिष्ट ठेवून नाबार्डने (राष्ट्रीय कृषी व ग्रामीण बँक)1992 साली स्वयं सहाय्यता गट बँक जोडणीचा उपक्रम भारतात सुरु केला. गेल्या पंधरा वर्षाच्या कालावधीमध्ये या उपक्रमाने जगभर सर्वात मोठा सूक्ष्म पत कार्यक्रम म्हणून प्रसिद्धी मिळाली आहे.

**स्वयंसहायता बचत गट म्हणजे काय?**

स्वयं सहाय्यता म्हणजेच, स्वत:ची मदत स्वतःच करणे. इतर कोणाच्या मदतीवर अवलंबुन न राहणे, कुटुंब चालवत असताना होणाऱ्या यातना किंवा होणारे कष्ट दुर करणे. स्वयंसहायता बचत गटांची स्थापना करण्यासाठी साधारणपणे 15 ते 20 लोकाचा किंवा महिलांचा समविचारी, समान आर्थिक गरज असेलेल्या एकाच गाव, पाड्यातील समुह एकत्र येणे आवश्यक असते. तो समुह एक विशिष्ट स्वरुपाचे उदिष्ट घेऊन स्वच्छेने एकत्र आला तर त्यास 'स्वयं सहाय्यता बचत गट' किंवा 'बचत गट' असे म्हणता येईल. या बचत गटातील प्रत्येक सभासद एकसमान रक्कम ठरावीक कालावधीत बचत म्हणून एकत्रित करीत असतात. त्याचा उपयोग सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी किंवा व्यवसाय उभा करण्यासाठी कर्ज पुरवितात त्याला 'बचत गट' असे म्हणतात.

**महिला बचत गटाचे फायदे :-**

- महिला बचत गट स्थापन केल्याने बचत गटांमधील असणारे सदस्य हे आपापसात मध्ये परस्पर सहकार्य करत असतात, तसेच त्यांच्यामध्ये परस्पर विश्वास हा खूपच मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण होत असतो.
- मित्रांनो, महिला बचत गटांना नेहमी कमी व्याजदरावर आर्थिक मदत ही खूपच मोठ्या प्रमाणामध्ये मिळत असते.
- महिला नेहमी महिला बचत गटांमध्ये काम करत असताना त्या स्वावलंबी बनत असतात.
- महिला बचत गटामध्ये महिला स्वावलंबी बनल्यामुळे त्यांना आर्थिक व्यवहाराची जाणीव होत असते. त्यामध्ये ज्यामध्ये त्यांना बचत कर्ज घेणे आणि पैसे परत देण्यास सर्व महिलांचा आत्मविश्वास हा खूपच मोठ्या प्रमाणामध्ये वाढत असतो.
- महिला बचत गटामुळे महिलांना घराबाहेर पडून नेहमी नवीन गोष्टी शिकायला मिळत असतात.
- महिला बचत गटामुळे महिलांच्या आर्थिक समस्या अगदी सहज सुटल्या जातात. कारण बँकांकडून सहज त्यांना आर्थिक मदत केली जाते.

- महिला बचत गटाच्या सदस्यांना नेहमी सरकारकडून लोक कल्याणकारी योजनांची माहिती मिळत जाते, तसेच त्यांना त्या योजनांचा लाभ देखील मिळत जातो तसेच महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना परतफेड करण्याची सवय खूपच मोठ्या प्रमाणामध्ये विकसित होत असते.

**बचत गटाच्या नियम व अटी:-**

1) **महिला बचत गटासाठी असणारे नियम**

- महिला बचत गटामध्ये सर्वांना समान बचत असावी.
- महिला बचत गटामध्ये सर्वांना समान बचत असावी.
- महिला बचत गटाच्या बैठकीला सर्व सभासदांनी नियमितपणे हजर राहावे.
- महिला सभासदाने नियमित रक्कम जमा केली नाही तर त्यास दंड ठेवावा.
- महिला बचत गटाच्या सभासदांना कर्जफेडीसाठी ठराविक कालावधीमध्ये योग्य ते हप्ते ठरवून द्यावेत.
- महिला बचत गटाच्या बाहेरील व्यक्तीस कर्ज देऊ नये पण गावांमधील असणाऱ्या दुसऱ्या बचत गटास कर्ज देण्यास काही हरकत नाही.
- महिला बचत गटामध्ये पुरुषांना सहभागी होता येणार नाही तसेच निर्णय प्रक्रियेमध्ये त्याचप्रमाणे कर्ज घेण्यासाठी त्यांना आपल्या पत्नीच्या वतीने देखील सहभाग घेता येणार नाही.
- महिला सभासदाने प्रथम घेतलेल्या कर्जाची परतफेड केल्या शिवाय दुसरे कर्ज देऊ नये.
- जेव्हा एखाद्या सभासदाला बँकेकडून कर्ज घ्यायचे असल्यास तेव्हा बचत गटांमधील महिलांची 75 टक्के सभासदांची त्यास मान्यता असावी, हा निर्णय लिखित स्वरूपात असावा.

2) **महिला बचत गटासाठी असणाऱ्या अटी**

- महिला बचत गटामध्ये कमीत कमी 10 व जास्तीत जास्त 20 सभासद नेहमी असावेत.
- महिला बचत गटांमध्ये सभासदाचे वय हे 18 पेक्षा जास्त असावे तसेच महिला विवाहित असावी.

- महिला बचत गट सुरू झाल्यानंतर काही महिन्यांनी एखादी महिला महिला बचत गटा मध्ये येण्यास तयार असेल तर तिला गटातील सर्व सभासदांच्या सहमतीने गटामध्ये घ्यावे. तसेच गटातील सदस्य संख्या पाहून तसेच गटामध्ये सामील करून घ्यावे त्याचप्रमाणे नवीन सभासदाने पूर्वीचे इतर सभासदांनी इतके पैसे भरावे लागतात.
- महिला बचत गट सुरू झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत मध्ये गटांमधील असणाऱ्या सर्व तरुण महिलांना सही करता आली पाहिजे. फक्त वयस्कर महिलांना अंगठा देण्याची परवानगी असावी.

**महिला बचत गटाचे उद्देश:-**

- गरीब, दारिद्रय रेषेखालील महिलांची पिळवणुक थांबावी आणि त्यांना समाजात ताठ मानाने जगता यावे हे बचत गटांचे मुख्य उद्दिष्ट दिसून येते.
- सावकारांच्या पाशात अडकावे लागु नये तसेच, प्रत्येकाला बचतीची सवय लागावी.
- बचत गटातील सदस्यांनी दैनंदिन/मासिक स्वरुपात काही बचत करायची आणि अडीअडचणींना या एकत्रीत बचतीतून कर्ज द्यायचे.
- दारिद्रय रेषेखालील गरिब महिलांच्या विकासासाठी 10 किंवा जास्तीतजास्त 20 महिला एकत्र येऊन बचत गट स्थापन करुन बचतीला प्रोत्साहन देणे आणि अडीअडचणींना गरजू महिलांना छोटे कर्ज मिळवुन देणे.

**महिला बचत गटाची वैशिष्ट्ये:-**

- बचत गटाच्या दरमहा मासिक बैठकीमध्ये जमा खर्चाचा आढावा ठेवला जातो.
- गटातील सर्व सभासदांना विश्वासात घेऊन बचत गटाची सर्व निर्णय आणि कार्यवाही केली जाते. स्वयं सहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून ज्या महिला मागासवर्गीय, आदिवासी महिलांच्या आर्थिक, सामाजिक, सास्कृतिक, शैक्षिणक विकासासाठी स्थापन केलेल्या बचत गटाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे मांडता येतील.
- बचत गटातील सदस्य ऐच्छिक असतात. सदस्य होण्यासाठी कोणावरही बळजबरी केली जात नाही.
- स्वयं सहाय्यता बचत गटाचा सर्व व्यवहार सर्वासमोर पारदर्शक रितीने पार पाडला जातो.

- शासकीय बँका, वित्तीय संस्था इत्यादींच्या सहकार्याने स्वयं सहाय्यता बचत गटाचा कारभार व व्यवहार चालवला जातो.
- बचत गटामार्फत जे आर्थिक व्यवहार केले जातात. त्याच्या सर्व लेखी नोंदी ठेवल्या जातात.

**यशस्वी महिला बचत गटाची वैशिष्ट्ये**

- यशस्वी बचत तेव्हाच गणला जातो, जेव्हा-जेव्हा गटाचे योग्य नियोजन आणि नियमावली तयार केली जाते.
- दरवर्षी गटातील गटप्रमुख बदलण्यात यावा.
- पासबुकात सभासदाने खाडाखोड करु नये.
- स्वतः पासबुक लिहु नये.
- गटातील सर्वांची बचत समान असावी.
- बचत गटाच्या नावाने बँकेत बचत खाते उघडण्यात यावे. दरमहा भरलेले जमा-खर्च व इतर रेकॉर्ड तपासून पहावे.
- सुरवातीचे 6 महिने कोणतीही कर्ज देण्यात येऊ नये.
- सभा दरमहा होणे आवश्यक.
- खर्च, पासबुक एन्ट्री आवश्यक.
- सभेत जे निर्णय होतात इतिवृत्त लिहणं आवश्यक.
- सभेपूर्वी इतिवृत्त वाचणे.

## संदर्भ ग्रंथ:-

1. बचत गट योजना - श्री. राजेश पिंजरकर.
2. बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक विकास - महेश जोशी.
3. महिला स्वयंसहाय्यता बचत गट- प्रा. यु. मुलाणी.
4. महिला स्वयंसहाय्यता गट- प्रा. रा. चैधरी.